# प्रेसनोट

दि.१२/०८/२०२५

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहिल्यानगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | श्रीगोंदा पो.स्टे., जि.अहिल्यानगर गुरनं.७६७/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | संभाजी शिवाजी घोडे, वय–३२ वर्षे, पद–पोलीस कॉन्स्टेबल, ब.नं.२११२, वर्ग–३, नेमणुक श्रीगोंदा पो.स्टे. रा.श्री.बनकर यांचे घरात भाडोत्री, मांडवगण रोड, ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ३,०००/– रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३,०००/– रूपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार हया कुटुंबासह श्रीगोंदा येथे राहण्यास आहेत. त्यांचा मुलगा शिक्षण घेत असून त्याचे विरुध्द श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे तक्रारी अर्ज करण्यात आलेला होता. त्या अनुषंगाने आरोपी लोकसेवक संभाजी शिवाजी घोडे यांनी तक्रारदार यांच्या मुलाला पोलीस स्टेशन येथे बोलाविले होते. त्याचवेळी तक्रारदार हया देखील पोलीस स्टेशनमध्ये गेल्या होत्या. त्यावेळी तक्रारदारांनी मुलाच्या विरोधात ज्यांनी अर्ज केला होता त्यांच्याशी बोलणे करुन प्रकरण आपसात मिटवले होते. परंतु आरोपी लोकसेवक घोडे यांनी तक्रारदार यांच्या मुलाचा मोबाईल ताब्यात घेऊन तक्रारदार यांना म्हटले की मी तुमचे प्रकरण मिटविणे करीता मध्यस्थी केली तुमच्या मुलावर गुन्हा दाखल झाला असता तो गुन्हा दाखल होऊ दिला नाही त्याकरीता मला २०,०००/– रुपये दया तरच तुमचा मोबाईल परत देईल. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे त्यांनी ला.प्र.वि. अहिल्यानगर येथे तक्रार नोंदविली. सदर तक्रारी प्रमाणे दि.११/८/२०२५ व दि.१२/०८/२०२५ रोजी आरोपी लोकसेवक घोडे यांचेविरुध्द लाच मागणी पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक घोडे यांनी तक्रारदार यांचेकडे सदर प्रकरणात मदत केली त्या बदल्यात ३०००/– रुपये लाचेची मागणी पंचासमक्ष करुन सदर लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविली. दि.१२/८/२०२५ रोजी आयोजित सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक घोडे यांनी तक्रारदार यांचेकडुन ३०००/– लाचेची रक्कम स्वीकारली असता त्यास रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहिल्यानगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(अजित त्रिपुटे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहिल्यानगर